**प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत दिव्यांगाना प्राधान्य देण्याबाबतच्या तरतूदीचे काटेकोर पालन करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः प्रआयो-२०१८/प्र.क्र.८९/योजना-१०**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ०५ एप्रिल, २०१८.

**शासन परिपत्रक :-**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) केंद्र पुरस्कृत योजना असून योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात येते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वामधील परिच्छेद ३.४ मधील ३.४.६ मध्ये "प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ची प्राथम्यक्रम यादी तयार करतांना, एखाद्या कुटूंबांत अपंग सदस्य आहे पण कोणीही वयस्क सदस्य नाही अशावेळी Additional deprivation score दिला जातो, ज्यायोगे अशा कुटूंबांना प्राधान्य सूची बनवितांना प्राथमिकता दिली जाऊ शकते. Person with Disabilities Act,१९९५ च्या तरतूदीनुसार राज्य शासनाने ३% अपंगांना लाभ दिला जाईल याची दक्षता घेतली पाहिजे". अशी तरतूद आहे. उद्दिष्ट निश्चित करण्याच्या मार्गदर्शक सूचनेमधील ३.४ मध्ये दिलेल्या इतर सूचना विचारात घेऊन सदर तरतूदीचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना याव्दारे देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०३१३३६४५६१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2018.04.05 11:21:46 +05'30'

**(अ.मा.काळे)**
अवर सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

१) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
४) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण, सीडको भवन,५ वा मजला, नवी मुंबई
५) उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
६) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
७) निवड नस्ती (योजना-१०)